
साभिप्राय पोंचपावती.

# नाट्यबोध.

म. ग्रं. सं. ठाणें
य काव्य
नं. ७५६७.



REFBK-0002141
REFBK-0002141

किंमत चार आणे.

६३३
पा. ३५
२९४७

# नाट्यबोध.

“ झालों जीर्ण तरि मनीं
आहे रसिकांत भर वसायाचा ”

—मोरोपंत.

लेखक व प्रकाशक
अनंत वामन बरवे.
२१९ नारायण पेठ, पुणें.


जुलई १९२२.

मुद्रक
गोपाळ बळवंत जोशी, ' आनंद ' छापखाना,
२३० सदाशिव पेठ, पुणें शहर.

2569

संगीत सम्राट

## मास्टर मनहर बरवे



REFBK-0002141
REFBK-0002141

यांस त्यांच्या अल्पवयांतील कौशल्याचे कौतुकास्तव हा 'बोध' अर्पण केला असे.

श्रीनटेश.



" ॐ नमः शिवायैचनमःशिवाय । "

# नाट्यबोध.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २७४१
संदर्भ शाखा

मंगलाचरण

विश्व हें ज्याचें आंगिक वाङ्मय तें वाचिक।
आहार्य ताराचंद्रार्क नमूं सात्त्विक ईश्वर॥
सत्त्वांगिकवाचिकाहार्य चतुर्विध अभिनय।
दाखवूनि विश्वमय दृश्य होय विश्वात्मा॥
यावत् विश्वाच्या अंतरीं भरूनि उरे बाहेरी।
यंत्रारूढ कलासूत्रीं बाहुल्यापरी नाचवी॥
त्या जगत्सूत्रधारातें शुद्धभावें शुद्धचित्तें।
नमिलें या पूर्वोक्तें नाट्यसूक्तें आरंभीं॥
नाट्य हें संसारादर्श संसार तो स्त्रीपुरुष।
म्हणूनि रूपविशेष नारीनरेश चिंतिलें॥
स्त्रीस अर्धांगी म्हणती अर्धें विश्व स्त्रीप्रकृती।
दर्शवी ईशपार्वती सगुणमूर्ति स्पष्ट हें॥
म्हणूनि तो नटनाथ कल्पोनी नाट्यदैवत।
चिंतिलासे हृदयांत यत्नासिद्ध्यर्थ अल्प हा॥
त्यानंतर वेदवक्ता भुवनत्रयनिर्माता।
नाट्यशास्त्रविरचिता श्रीविधाता वंदिला॥
रचिलें नाट्य विरिंचीनें व्यवहार्य केलें जेणें।
त्या भरतमहामुनींचीं चरणें सुमनेंचि अर्चिलीं॥

करूनि मंगलाचरण सर्वां अभीष्ट चिंतून ।
कथितों नाट्यपुराण सावधान परिसावें ॥
महत्व कळल्याविना वस्तु संग्राह्य वाटेना ।
बोधाया नटां किंचिज्ञां यत्न मना आणिला ॥
नटां नाट्यमहत्व इतरां उपयोगित्व ।
कळतां होय यथार्थ सार्थक श्रमाचें ॥
मुख्य भरतसूत्राधार त्यांतूनि घेतलें सार ।
संमत कांहीं इतर ग्रंथविचारही आले ॥
दशरूपक, गीतरत्नाकर, अभिनयदर्पण, साहित्यकार
भासभवभूत्यादि कवीवर कालिदास कवीश्रेष्ठ ॥
शूद्रक विशाखदत्त जगन्मान्य यांचे ग्रंथ ।
आणून ते अवलोकनांत तदाधारें यत्न हा ॥
आद्यश्रेय या कृतीचें यास्तव त्या सर्वांचें ।
म्हणूनि स्मरण साचें साभार त्यांचें आरंभीं ॥

## नाट्योत्पत्ति

एकदां अनध्यायदिवशीं आत्रेयप्रमुख ऋषी ।
गेले भरताचार्यापाशीं प्रश्न त्यांशीं विचारिती ॥
संमत चतुर्वेदास पंचमवेद म्हणती ज्यास ।
सांगोपांग त्या सुरस नाट्यशास्त्रास ऐकवा ॥
कोण कर्ता किं निमित्त कैसें आलें भूलोकांत ।
काय विधिनियम यांत हें साद्यंत सांगावें ॥
ऐकूनि ऋषींचें वचन भरतमुनि प्रसन्नमन ।
कथिती नाट्यपुराण तेथ अवधान सर्वांचें ॥
पूर्वी कृतत्रेतासंधिकाळीं सर्व सुरासुर मंडळी ।
ब्रह्मदेवा समीप गेली प्रार्थिती झाली यापरी ॥

इच्छा आम्हां असे एक नवेंच द्यावें क्रीडनीयक ।
दृश्यश्राव्य उभयात्मक आल्हादक सुबोध ॥
आहेत क्रीडाप्रकार ते एकदेशीय फार ।
सकल कलांचें सार ऐसा विहार द्या कांहीं ॥
जो सर्व आबालवृद्धां जाणत्यांनेणत्यांसुद्धां ।
प्रकृत्यवस्था विविधा प्रिय व्हावा त्यांसही ॥
हेतु सकलांचा जाणून संकलिपतां होय द्रुहिण ।
जी क्रीडावस्तु निर्मीन तीं संपन्न अशी असो ॥
दिसावया प्रियरूप अंतरीं बोध अमूप ।
मधुस्निग्ध जैसें अपूप सुप्रसिद्ध सूपशास्त्रीं ॥
सत्कर्मांतें प्रवर्तक होय सद्भावदर्शक ।
अपूर्वच वेद एक हा नाट्याख्य पांचवा ॥
सद्धर्माचा साधक सत्कीर्तीचा संपादक ।
ऐश्वर्य पुण्यदायक सुखदायक सर्वांतें ॥
विश्व त्यांत प्रतिबिंबावें बिंबें विश्वा मग बोधावें ।
ऐशा अन्योन्याश्रयें रम्य असावें दोघांहीं ॥
गत गोष्टींचा इतिहास यावा दृक्प्रत्ययास ।
तोच मग पुढिलांस सन्मार्गास दावील ॥
सद्धर्माचा साधक सत्कीर्तीचा संपादक ।
ऐश्वर्य पुण्यप्रदायक सुखदायक सर्वांतें ॥
करूनि संकल्प यापरी आठविले वेद चारी ।
अगाध रचनाचातुरी केली दुसरी सृष्टि ती ॥
ऋग्वेदांतूनि पाठ्य निर्मिलें अभिनय यजुर्वेदांतले ।
गीत सामांतूनि घेतलें अथर्वणांतले रस ॥

या रीतीं चतुर्वेदांशें नाट्य निर्मिलें लोकेशें ।
तें विधिनियमवशें केलें विशेष सुस्थित ॥

प्रयोगारंभ

जेव्हां रचना ही झाली होतों संनिध मी बद्धांजुली
प्रयोगार्थ मज दिली आज्ञाहो केली ती ऐका ॥

मिळवावे शिष्यसुत योजूनि कांहीं इतिवृत्त ।
दैत्यांसह देवां समस्त नाट्य शास्त्रोक्त दावावें ॥

ऐकूनि आज्ञा विरिंचीची केली सिद्धता प्रयोगाची ।
कथा समुद्रमंथनाची ख्यात साची योजिली ॥

पूर्वी सुरासुर मिळून केलें समुद्रमंथन ।
रत्नें निघतां त्यांतून दैत्यां वंचून देव घेती ॥

हा जो भाग सर्वश्रुत तोच रंगसाहित्यांत ।
नटवूनि प्रयोगार्थ मी साद्यंत घेतला ॥

ध्वजमहापर्वदिन समय तो अनुलक्षून ।
दाविला प्रयोग करून तुष्टमन देव झाले ॥

मग देवें इंद्रमुख्यें देऊनि पारितोषकें ।
माझीं नाटकवालकें कौतुकेंचि गौरविलीं ॥

परी हा प्रयोग पाहतां क्रोध आला सर्वां दैत्यां ।
त्यांची पराभवकथा सहज चित्ता झोंबली ॥

मग एका प्रयोगकाळीं त्यांहीं माया निर्मिली ।
वाचा चेष्टा निरोधिली स्तब्ध केलीं नाटकपात्रें ॥

पाहूनि विघ्न अकस्मित चिंतितां कळे राक्षसी कृत्य
पाचारूनि विश्वकर्म्याप्रत आज्ञापीत पितामह ॥

## रंगभूमि

नाट्यमंडप निर्मावा विघ्नां अभेद्य असावा ।
रम्य प्रशस्त करावा व्हावा सर्वां सुखप्रद ॥

ऐसी आज्ञा ऐकून मग पाहिला शुभदिन ।
सम स्थिर आणि कठिण भूमि शोधूनि घेतली ॥

कृष्ण गौर वर्णांकित नसे तृणगुल्मास्थि जींत ।
भूमि यापरी प्रशस्त मंडपार्थ पाहिली ॥

वर्तुळ चतुष्कोण त्रिकोण आहे त्रिविध रंगस्थान ।
उत्तम मध्यम सामान्य हेंच मान अनुक्रमें ॥

ऐसा मंडप योजिला तो अर्धार्ध विभागिला ।
संज्ञा प्रेक्षागृह एकाला दुसऱ्याला रंगपीठ ॥

सोपानाकृति आसनें ठायींठायीं वातायनें ।
सहज दृश्यश्राव्यगुणें प्रेक्षकमनें संतुष्ट ॥

समभूमि रंगस्थल जैसें कां आदर्शतल ।
प्रेक्षकांकडे किंचित् सखल असे कल तियेचा ॥

मंडपीं त्रिकोणीं असतीं द्वारें तिन्ही कोणीं ।
रंगपीठ मध्यस्थानीं वरतीं सारें मोकळें ॥

निसर्गास अनुसरून केलें आभास उत्पन्न ।
जवनिकांचें साधन यंत्रजालसंयुक्त ॥

रंगशीर्ष गंभीरस्वन पृष्ठतः नेपथ्यस्थान ।
मुखपट शोभायमान चित्रतोरणभूषित ॥

दृष्टिरम्य प्रकाशयोजना मंद, तीव्र वर्णी नाना ।
बहुविध स्थलप्रसंगांना प्रवेशांना अनुरूप ॥

कांहीं वक्र कांहीं स्फोटक कांहीं स्वरित कांहीं धांवक
प्रेक्षकांस अदर्शक ऐसे दीपक रंगस्थलीं ॥

बैसावया सुखासनें सहज पहाया दर्शनें ।
ऐकाया गीत–भाषणें कष्ट श्रवणें न होती ॥

एवं शिल्पशास्त्रनियमें केलें नाट्यगृह विश्वकर्में ।
स्थलींस्थलींच्या दृग्भ्रमें त्यांत रमे चित्तवृत्ति ॥

पाहूनि नाट्यगृहरचना हर्ष झाला चतुरानना ।
केली त्यामध्यें स्थापना रक्षणार्थ देवांची ॥

दैव मृत्यु दोघे भले निर्भिडवृत्ति चांगले ।
महाद्वारीं ते ठेवले योग्य केले द्वारपाल ॥

सूर्य सोम हुताशन मारुत रुद्र वरुण ।
यक्षोरग केले स्थापन नाट्यसदनरक्षार्थ ॥

जो प्रभाव ज्या देवांत त्याच कर्मीं तो नियुक्त ।
करूनि तें दैवत तो तेथ स्थापिला ॥

मुख्य जें का रंगस्थान विरिंचीचें निजासन ।
तेथिंचा असे म्हणून पूजासंमान विशेष ॥

व्हावें प्रयोगसमयीं पुष्पमोक्षण त्याठायीं ।
तेथ पवित्रता राही ऐसें सर्वांहीं वर्तावें ॥

प्रयोग संपेपर्यंत नटें रहावें दीक्षित ।
तिहीं त्या रंगस्थलांत शुचिष्मंत असावें ॥

असूं नये दुर्विकार करूं नये आनाचार ।
नाट्यावांचूनि अन्यप्रकार सर्व कांहीं विसरावा ॥

यापरी विघ्ननाशना सर्वत्र देवस्थापना ।
तशीच केली योजना रक्षणासाठीं पात्रांच्या ॥

इंद्र रक्षी नायकाप्रती नायिकेस सरस्वती ।
ॐकार विदूषकाप्रती शेषप्रकृती शिव स्वयें ॥
विघ्नें टाळायाकारणें लागे जरी ऐसें करणें ।
तरी सामोपवचनें द्रुहिणें दैत्यां बोधिलें ॥

## सामोपचार

व्यर्थ तुमचा खेद नका वाटूं देऊं विषाद ।
दिसलें जरी बहुविध हेतु शुद्ध नाट्याचा ॥
जे इतिहास घडती त्यांची यांत प्रतिकृती ।
ठेविली उपहासवृत्ति ऐसी कृति नव्हे ही ॥
खेद विषाद वाटून दुखवावें कुणाचें मन ।
एतदर्थ हा प्रयत्न केला ऐसें न गणावें ॥
सर्वां कौतुक वाटावें गुणावगुण कळावे ।
दर्पणीं बिंब दिसावें तैसें व्हावें नाट्य हें ॥
रसिकां संतोषकर मूर्खां उपदेशपर ।
बुधां विचारप्रचुर मनोविहार मर्मज्ञां ॥
आंगीचें दुर्गुण जाया दृढ सद्गुण ठसाया ।
नाट्य निर्मिलें हेतूनें या कळावया कर्माकर्म ॥
खिन्नें व्हावें प्रसन्न प्रसन्नें उदारमन ।
नाना प्रकृतीचे जन समाधान पावावे ॥
सुष्ट दुष्ट स्वभाव नाना रस नाना भाव ।
या सर्वांचा प्रभाव नाट्य नांव त्यास हें ॥
सर्व शास्त्रें सर्व योग सुखदुःखादि भोग ।
यांचा सुंदर संयोग नाट्यप्रयोग असे हा ॥

व्यक्ति सांडूनि प्रकृती कृति न घेतां परिस्थिति ।
या भावें नाट्यचमत्कृती पाहिली ती पाहिजे ॥
पहावें रसिकपणें उदार निर्मल मनें ।
तेंच वृत्ति या रंजनें उन्नत गुणें वाढेल ॥
असावें सावधान देत जावें उत्तेजन ।
होय उत्साहवर्धन ऐसें वर्तन ठेवावें ॥
ग्राम्य निषिद्ध अशास्त्र किंवा कांहीं अपवित्र ।
दृष्टिश्रुतीस अपात्र तें मात्र धिक्कारावें ॥
एतद्विषयीं अधिकार आहे प्रेक्षकांचा थोर ।
त्यांनीं पाळितां साचार प्रकार हे लोपती ॥
नाटकास भलभलतें वळण जें दिसून येतें ।
केवळ प्रेक्षकांमुळें तें आवडनावड तयांची ॥
चांगल्याच गोष्टींचा आदर आग्रह दिसतां त्यांचा ।
अन्यथा नाटकांचा प्रचार सर्व लोपेल ॥
बरेंवाईट नाट्याचें रूप जें असावयाचें ।
निःसंशय प्रेक्षकांचे हातीं साचें यामुळें ॥
प्रेक्षकत्वाची योग्यता ऐसी जाणूनि तत्त्वतां ।
नाट्यप्रयोग पाहतां होय चित्ता मोदरूप ॥
गुण भोगस्वरूपानें दुर्गुण त्यागरूपानें ।
तैसीं प्रियाप्रिय दर्शनें तेथ पाहणें सर्वांहीं ॥
प्रिय जें दिसेल साचें तें निजांगीं आणायाचें ।
अप्रिय तें टाकायाचें पहावयाचें या रीतीं ॥
सकलां आनंद व्हावा सन्मार्गही समजावा ।
रंजनमिषें बोधावा हेतु जाणावा यामाजीं ॥

स·काव्य
४३३



ऐसा सङ्केतू नाट्याचा ऐकूनि विरिंचीमुखींचा ।
गेला विषाद दैत्यांचा हर्ष साचा सर्वांना ॥

नृत्यगीतयोजना

पुढें एकदां कैलासीं जाऊनि शंकरापाशीं ।
त्रिपुरदाह खेळ त्याशीं रौद्ररसीं दाविला ॥
अभिनव ही रचना संतोषवी उमारमणा ।
त्यांनीं ही चतुरानना केली आज्ञा मग एक ॥
गीतनृत्यावांचून नाटय नव्हे रसपूर्ण ।
एतदर्थ तें योजून प्रियदर्शन करावें ॥
सहगीत व्हावें नृत्य कोठेंकोठें प्रयोगांत ।
नमनाशीर्वचस्तौत्य त्यांत उचित विषय हे ॥
देवगुरूंतें नमन सर्वांस आशीर्वचन ।
काव्यकर्त्याचें वर्णन यशोगान भर्त्याचें ॥
ऐशा पूर्वरंगानें प्रसन्नतील सर्व मनें ।
प्रयोगही आपत्तीनें तैसा विघ्नें लिप्त नव्हे ॥
मध्येंही कथाप्रसंगीं गीत नृत्य यावें प्रयोगीं ।
अतिप्रसंग मात्र रंगी होऊं नये तयांचा ॥
गीतनृत्याचा अति प्रसंग करी सर्वथा रसभंग ।
कालस्थल पाहून योग्य संयोग त्यांचा ठेवावा ॥
शुद्धमुद्रेचें संगीत आहे कठिण नाट्यांत ।
साधेल तेणेंच त्यांत प्रयत्न कांहीं करावा ॥
तानासाठीं माना दिसती विचित्र हालतांना ।
आलाप वेंगाडी तोंडांना तालसुरांना हातवारे ॥

होती अभिनय संगीताचे जाती लोपूनी भूमिकेचे ।
कौतुक एक गायनाचें बाकी नाट्याचें शून्यरूप ॥
नाट्याची ऐसी हानी न व्हावी गीतनृत्यांनीं ।
कौशल्य हें नटांनीं कवींनीं अवश्य राखावें ॥
असो यापरि पवित्र सिद्ध झालें नाटयशास्त्र ।
यथावकाश भरतपुत्र प्रयोग सर्वत्र दाविती ॥

नाट्यशाप

एकदां एका प्रयोगकालीं पात्रांस दुर्बुद्धि झाली ।
दर्शनें ग्राम्य दाविलीं अभिशंसिली नटविद्या ॥
अपमान देखतां स्पष्ट प्रेक्षक ऋषी क्रोधाविष्ट ।
शापिती व्हाल पतितनष्ट नाटयही दुष्ट तुम्हांसंगें ॥
तुम्ही या क्षुद्र आचारें शूद्रप्राय व्हाल सारे ।
मानिले जाल अनादरें सर्वप्रकारें लोकांत ॥
अनाहूत ब्राह्मणांत वर्ज्य हव्यकव्यांत ।
नटमुखावलोकनांत महादुरित राहील ॥
केल्या प्रयत्नाचा अंतीं परिणाम पाहतां चित्तीं ।
खिन्न भरतमुनी होती पुढें गति सुचेना ॥
व्यर्थ नोहे ऋषीशाप मागतां मिळेना उःशाप ।
मग प्रायश्चित्तें अपाप व्हावें निष्पाप लागलें ॥
नाटय ठरलें पतित अग्राह्य झालें ऋषींत ।
होऊं लागलें स्ववेश्यांत रंजनार्थ देवांच्या ॥

उःशाप

पुढें स्वर्गीं प्रसंगवशें नाटय पाहिलें नहुषें ।
आणावें भूलोकीं ऐसें सहज संतोषें वाटलें ॥

ना.क्रं.०५
६३३



परी कळतां शापकथा झाला विरिंचीतें प्रार्थितां ।
द्यावें क्रीडनीयक ताता शुद्ध तत्त्वतां करोनी ॥
मनोहर नाट्यकला व्हावी संग्राह्य सकलां ।
सोडोनी खलां अमंगलां दूर निर्मला राहावी ॥
तियेच्या अवलंबनें दूष्य होऊं नये कोणें ।
नानासिद्धि नाट्यगुणें सर्वजनें पावाव्या ॥
व्हावा सर्वांत आदर तैसा सर्वत्र संचार ।
सर्व कलांचें हें सार साचार सर्वभोज्य ॥
विरिंचीनें तेव्हां कथिलें जें वेदाधारें निर्मिलें ।
आहे शुद्ध परी दूषिलें नटें आपुलें कुकर्मे ॥
जो विचाराधारें सांभाळी विधिनियमें प्रतिपाळी ।
त्यास शापबाधा मुळीं कदाकाळीं होईना ॥
धरूनि शुद्ध हेतूस सम्यक् परिपाळिल्यास ।
पुण्य मान आणि यश सर्व कार्यास ठेविलें ॥
परी दुष्कर्में दूषितां सर्वां येते दुरवस्था ।
नाट्यामाजीं मोहकता आहे पाहतां विशेष ॥
नाट्यकलेभोंवतीं नाना संमोह जमती ।
टाळावे ते लागती दृढ सद्वृत्ति ठेवूनी ॥
सहज प्रिय लोकांत नाट्यगुणें नट होत ।
असल्यास तो दुर्वृत्त सर्व पतित त्यासंगें ॥
नाट्य क्रीडारूप जरी तरी पाहिजे सत्करीं ।
शापभय हें नातरी राहे शिरीं अखंड ॥
नटांचे आहेत अधिकार प्रयोगाचाहि कालविचार ।
वर्ज्यावर्ज्य नाट्यप्रकार जाणिले साचार हवेत ॥

नट कुलीन बुद्धिवान गुणें असावा सत्वप्रधान ।
नसावाच वयें जीर्ण रूपहीन दुर्मुख ॥
व्यंग अथवा दुर्बळ सदा मंद अमंगळ ।
दिसावया अजागळ दुःशील तो नसावा ॥
शुद्धगुणी स्त्री वा पुरुष त्यानेंच घ्यावा नटवेष ।
अनीतिमंताचा स्पर्श या नाट्यास नसावा ॥
दुर्गुणी दुर्लक्ष करून गुणास्तव दिला मान ।
तरी जो दुराचरण दुग्धीं लवण होय तो ॥
नाट्य व्हाया सर्वमान्य नट हवेत सद्वर्तन ।
तरीच प्रयोगप्रेक्षण जनांचें मन बोधील ॥
कवी शिल्पी चित्रकार एक्या नटांत हे प्रकार ।
व्हावा लोकीं आदर ऐसा अधिकार नटाचा ॥
पाठ्यांत लागे कवित्व अभिनयांत शिल्पपटुत्व ।
वेषालंकारग्रहणांत कुशलत्व चित्रकाराचें ॥
चित्रकला आणि कविता निर्जीवचि स्वभावतां ।
कौशल्यें त्या उभयतां सजीवता नट आणी ॥
अकाल अतिकाल वर्जून व्हावें नाट्यप्रदर्शन ।
कर्मलोप किंवा शीण निद्रानाश न व्हावा ॥
शृंगाररसप्रयुक्त नाट्य प्रदोषकालीं युक्त ।
सद्धर्मकथा ज्यांत तें प्रशस्त पूर्वाण्हीं ॥
ज्यांत गुण सत्वादिक अपराण्हीं तें आल्हादक ।
प्रभातीं भक्ति करुण मुख्य नाट्य कौतुक देतसे ॥
लज्जासंकोचकरक्रिया सर्वथा प्रयोगीं नसाव्या ।
स्पर्शूं नये भाषाभिनया ग्राम्यछाया अल्पही ॥

मताकन्यास्नुषाकलत्र पिताभ्रातापुत्रमित्र ।
मिळूनि सर्वही गोत्र प्रयोग एकत्र पाहती ॥
याकारणें प्रयोगांत नसावें ग्राम्य किंचित् ।
गंभीर आणि उदात्त नाट्यवृत्त दिसावें ॥
शब्द प्रौढ बोधपर मान्य असावे विचार ।
सकल कांहीं आचार सभ्याकार दिसावा ॥
अधम पात्रें अधम कल्पना प्रमुखत्व नसावें यांना ।
क्रूर घोर प्रसंगांना सहसा वाव ठेवूं नये ॥
भाषाभिनय अस्वाभाविक नव्हे नाट्याचें द्योतक ।
सहजक्रिया मनोवेधक परिणामकारक होय तीं ॥
मर्यादा आणि मार्दव स्त्रीवेषांत मुख्य भाव ।
दिसतां यांचा अभाव स्वभावदर्शन नव्हे तें ॥
धटिंगण हिर्डीस योग्य नव्हे स्त्रीवेष ।
तो स्त्रीत्वाचा उपहास किळस ये पाहतां ॥
स्त्रियांचें भावव्यंजन व्हावें मर्यादा ठेवून ।
दिसतां असभ्यपण दुष्ट वळण लावतें ॥
स्त्रीवेषासाठीं स्त्रिया उत्तमाचि तें असलिया ।
तेणें अमर्याद क्रिया सहजाचि या लोपती ॥
स्त्रियांच्या प्रमुख भूमिका त्यांचे भेद लक्षणें ऐका ।
देवता कुलवती परिव्राजिका परिचारिका वारयोषा
मुद्रा प्रसन्न देवतेची सत्वसंपन्न कुलवतीची ।
निरिच्छ परिव्राजिकेची शेष त्या लीन–उद्धत ॥
देवता औदार्यपूर्ण परिव्राजिका विरक्तगुण ।
कुलवतींत सदाचरण सेवापरायण परिचारिका ॥

गणिकांचे असभ्याचार वेषभाषाभिनय स्वैर ।
जाणून हे भिन्न प्रकार व्हावा अनुकार तदनुरूप ॥
पुरुषांचेहि भूमिकाभेद सांगतों कांहीं करून विशद।
प्रकृती अवस्था विविध असती भेद त्यापरी ॥
दैवी, मानुषीविभूती तिसरी पिशाच्चराक्षसी ती ।
भेद ठळक हे दिसती गुणत्रयाच्या अनुरोधें ॥
दैवी भूमिका सत्वातिशयाची मानुषी रजोगुणाची
तामस राक्षसपिशाची नटली दिसावी त्या गुणें ॥
सत्ता ऐश्वर्य आनंद दैवी प्रभाव हे सिद्ध ।
मानवी गुणद्विविध सुष्टदुष्ट स्वरूपें ॥
तामस भूमिका विध्वंसक अमंगल भयानक ।
करूनि यांत न्यूनाधिक पुरुष भूमिका सिद्ध होती ॥
नाट्यनृत्यगीतांत दिसून यावें पटुत्व ।
दैन्य रंगसाहित्यांत अल्पमात्र नसावें ॥
कथा सुबोध सरस उज्ज्वल अलंकार वेष ।
सभ्य शांत रम्यतेस मान विशेष असावा ॥
आधीं करावी मंगलस्तुती भरतवाक्य असावें अंतीं
येणे नाट्यकर्माप्रती सहसा आपत्ती बाधेना ॥
प्रमुख नाट्याचार्यानें शुभाकृति शुभ वेषानें ।
नित्य मंगलाचरणें आरंभणें नाट्यकर्म ॥
कथा प्रख्यात असावी किंवा सहज कळावी ।
भाषा सुगम योजावी क्लिष्ट नसावी गीतपाठ्यें ॥
क्रमें एकाहूनी एक सरस व्हावेत अंक ।
जो ज्या रसा बाधक तो आवश्यक टाळावा ॥

वा. क. ............

मुख्य योजावा एक रस अन्यें त्याचा परिपोष ।
वस्तुरचना विशेष ऐसी सुरस करावी ॥
ठेवावीं रम्यदर्शनें मधुरगीतें भाषणें ।
प्रचुर सुभाषितानें प्रेक्षकमनें बोधावीं ॥
धरून उच्च हेतूस उदार व्यापक तत्वास ।
सहज दिसावें सिद्धीस अखेरीस गेलेलें ॥
नाट्यें रंजवीतां जन उन्नत व्हावें त्यांचें मन ।
नाट्यरचनेचें धोरण हेंच सामान्य असावें ॥
जो जो भाव जी जी कृती भूमिकेस्तव नट घेती ।
केवल रंगपीठापुरती इतरत्र ती न दिसावी ॥
जनांत जनांसारखें नटें वागावें लौकिकें ।
आचारनीतिविन्मुखें होत पारखें कल्याण ॥
ऐसीं पथ्यें जाणून नाट्य न्यावें येथून ।
नातरी शाप दारुण आहे शासन करावया ॥
नाना कलांच्या मिश्रणें नाट्य हें रसायन बने ।
तें सांभाळूनी पथ्यानें धारण जनें करावें ॥
नातरी फुटेल आंगीं गोष्ट नव्हे वरपंगी ।
वाटूं दिल्यास वाउगी प्रत्यय जगीं येईल ॥
महानुभाव स्वयें असतां बाधे शाप भरतसुता ।
क्षीणपुण्य तुम्हां मर्त्यां त्याची बाधकता अधीक ॥
अति संपन्न वस्तूशीं अतिच लागे जपावयाशी ।
सांगूनि पथ्यें ऐसीं दिला उश्शापून नाट्यवेद ॥

## फलश्रुती

नाटकाची फलश्रुती आहे सांगूं गोड किती ।
यज्ञ चाक्षुष याप्रती सद्गतिप्रद म्हणतील ॥
देव तुष्ट नांदीस्तवनें साधु प्रसन्न सद्वस्तूनें ।
संगीतें व संभाषणें सामान्य मनें संतुष्ट ॥
जें का आजन्ममरण भूतमात्राचें जीवन ।
तें जणुं नाट्यानुकरण प्रयोगप्रेक्षण शीकवी ॥
नट जैशी दावीं सोंगें नानाभावें नानारंगें ।
सर्वां जीवां त्याच ढंगें जगीं लागे वर्तावें ॥
कधीं पिता कधीं पुत्र केव्हां कन्या स्वसा कलत्र ।
वेष भाषा विचित्र जीवमात्र पत्करी ॥
बाल्यतारुण्यवार्धक्य अवस्था घेउनी अनेक ।
संपे हें जीवन्नाटक नाट्यरूपक शीकवी ॥
जगीं असावें जीवन्मुक्त हा जो अध्यात्मसिद्धांत ।
प्रत्यहीं नाट्यप्रयोगांत प्रत्यया येत नटाच्या ॥
दावूनि तादात्म्य भूमिकेशीं करी चेष्टा नानारसीं ।
परी अंतरीं स्वरूपाशीं नट सर्वांशीं विसरेना ॥
उत्तम नटाचें लक्षण हेंचि मानिती विचक्षण ।
अंतरीं सावध पूर्ण बाह्यदर्शन बहुरूप ॥
याच रीतीं विचरावें लिप्तपणें अलिप्त राहावें ।
नाट्य शिकतां मनोभावें शिक्षण घ्यावें सहज हें ॥
भूमिकेचा अभ्यास समजूनियां रहस्य ।
करितां तो दुर्गुणास करूंच स्पर्श देईना ॥

दुर्गुणांची मोहकता केवळ ते दूर असतां ।
परी आंगीं वागवतां जाचकता पदोपदीं ॥
तैसे नसती सद्‌गुण ते सदा सुखभूषण ।
तेणें शांतिसमाधान विलक्षण अंतरंगीं ॥
ऐसे गुणावगुणाचे जे जे परिणाम साचे ।
ठसती चित्तीं नटाचे नाट्याचेनि अभ्यासें ॥
सौंदर्याची आवड जनप्रियतेची चाड ।
भाषारीतिस्थिति गोड अभ्यासें दृढ नाट्याच्या ॥
नट अजागळ दिसेना तो अमंगळ राहीना ।
कधींही उदासपणा आढळेना तयाठायीं ॥
मुद्रा सदा सुप्रसन्न मोहकगुण भाषण ।
आकृतींत वेधकपण उदारमन नेहमीं ॥
एवंच हें नाट्यशास्त्र आहे जैसें पवित्र ।
तैसेंच इहपरत्र सर्वत्र श्रेयस्कर ॥
सर्व कलांमध्यें श्रेष्ठ काव्यकला आहे स्पष्ट ।
परी काव्यांतही नाट्य आहे वरिष्ठ मानावें ॥
नाट्य त्रिवर्गाचें साधन बोलिलेंसें विष्णुपुराण ।
धर्मार्थकामसंपादन नाट्ययोगें होतसे ॥

## नाट्यकथा

नाट्य मृत्युलोकीं आलें तें राजाश्रयी बनलें ।
यात्रोत्सवीं होऊं लागलें कालेंकालें लोकांत ॥
इतिहासपुराणकथानकें त्यांवरीं रचूनि नाटकें ।
नानारसीं जैसें भातुकें कवी देती नटांना ॥

नाट्याचा रंजनोद्देश संभाळूनि सावकाश ।
अन्यही कांहीं विशेष अर्थ चतुर साधती ॥
१ एकदां पूर्वी द्वापारीं वज्रनाभदैत्यपुरी ।
जिंकिली यादववीरीं नाट्यचातुरी दावूनी ॥
ऋषींचा वरद एक होता महानट भद्राख्य ।
तयाच्या आश्रयें मुख्य नाट्यकौतुक योजिलें ॥
भद्रें एका सत्रांत नाट्य दाविलें ऋषींत ।
होतां ते प्रसन्नचित्त वर इच्छित लाभला ॥
नाट्य सर्वगामी झालें सर्वभोज्यही ठरलें ।
सहज मग उपयोगिलें शत्रु खुळे जिंकावया ॥
घेऊनियां नटवेष प्रयोगाचें करूनि मिष ।
केला यादवें प्रवेश दैत्येश तो जिंकिला ॥
पुढें याच नाट्यगुणें वर्तलें जें ग्राम्यपणें ।
तें तेचि यादव तेणें पूर्णपणें नष्ट झाले ॥
तीहि कथा ऐकावी जिनें माजली यादवी ।
सद्बुद्धीच्या अभावीं परिणाम घोर पावले ॥
२ एका यादव कुमाराला सुंदर स्त्रीवेष दिधला ।
ऋषी सन्निध नेला गरोदर रूपानें ॥
पुसती या स्त्रीस पुत्र किं कन्या होय तीस ।
कापट्य पाहूनि तयांस शापवचन मुनि देती ॥
होतां ही प्रसूत मुसळ होईल प्राप्त ।
तुम्हा सकळांचा घात करील तें निश्चयें ॥
परिणामीं तैसेंच झालें यादव कलहास पेटले ।
आपसांत रण माजलें नष्ट झाले मुसळानें ॥

३ कथासरित्सागरांत नंदनटाचें आहे वृत्त ।
एकदां त्याचें नाट्यकृत्य वररुचीनें पाहिलें ॥
वयें लहान वररुची पाठशक्ती थोर त्याची ।
एकदांच पाहून त्या नटाची करून अनुकृती दाखवी
नंद नट लोकप्रिय आबालवृद्धां आनुकार्य ।
सर्व ज्याचे भावाभिनय प्रेक्षक हृदय हालविती ॥
४ नट एक गंधर्वनामा आला गौडदेशपतिधामा ।
सांगे आपुला नाट्यमहिमा वर्णून कांहीं विशेष ॥
परी नृपतीच्या धूर्त प्रधाना ही प्रौढी सत्य वाटेना ।
कठिण भूमिकेची केली योजना परीक्षणार्थ नटाच्या
भवभूतीच्या उत्तररामांत सीताविरहें राम दुःखार्त
प्रवेश तृतीय अंकांत त्याचा अनुकार सांगितला ॥
गंधर्वें छद्म ओळखिलें परी कर्तव्य मनीं आणलें ।
कौशल्य एकवटूनि आपुलें सिद्ध केलें नाट्यकार्य ॥
दर्शन होतां पंचवटीचें स्मरण जाहलें गतगोष्टींचें ।
सीताविरहें दुःखशोकाचे फुटती उमाळे अनिवार ॥
शोकक्षोभ तीव्र झाला तेणें ठाव मिळे मोहाला ।
मोहांतून मुक्त व्हायाला नाहीं सीतास्पर्श तेथें ॥
मोहापर्यंत अभिनय सर्व दाविता झाला नट गंधर्व ।
सीतेवीण मूर्छापर्व मृत्युपर्यवसान पावे ॥
नट विष्णुरूप पावला खेद नृपाप्रधाना झाला ।
नाट्यछलाचा हा एक दाखला शेष राहिला लोकांत
५ होती एक राजकन्या शीलें वृत्तें सर्वमान्या ।
दत्त भक्तीनें अनन्या झाली धन्या त्रैलोक्यीं ॥

अल्पवयापासून श्रीदत्तावरीं तिचें मन ।
प्रेमें नेमें दत्तध्यान कांहीं अन्य नावडे ॥
उपवर झाली जरी पतिभाव ही दत्तावरी ।
आप्तेष्टजन अंतरीं खेद करी दारुण ॥
आला एक नटमुनी अति चतुर नाट्यगुणी ।
भूमिका यथार्थ घेऊनी चमत्कृती दावितसे ॥
राजकन्येचीऐकूनिभक्ती धरिला कुभाव चित्तीं ।
बनूनि कृत्रिम दत्तमूर्ती वंचियली ती कन्या ॥
दत्तभावें सर्वस्वार्पण तिनें केलें त्या कारण ।
झालीं अपत्यें पाहती जन वार्ता सर्वत्र पसरली ॥
दत्त झाले संसारी विलास भोगिती राजमंदिरी ।
दत्तभक्तांच्या अंतरीं वार्ता दुःसह जाहली ॥
दत्तभक्त होते जे जे आले जमूनि सर्व राजे ।
कळोनी संकट नटमुनी लाजे पळे तेथूनि गुप्तपणें॥
गेला आत्महत्या कराया करुणा आली दत्तराया ।
कौतुकें वर देउनीया दत्तस्वरूपीं राखिला ॥
झाला प्रकट राजसमूहीं वंदिलापूजिला भावें त्यांहीं
कृत्रिमता जाऊनि राही तेथेंचि तो दत्तरूप ॥
६ एका राजकन्येनें नाटकाच्या प्रयोगानें ।
चेतवूनि जनमनें इष्टकार्य साधिलें ॥
राजकन्येचा प्रियपती होता महा थोर नृपती ।
निर्दयपणें तयाप्रती वधिलें तिच्या बंधूनें ॥
परम करुण ती कथा द्वेषमूल जरी तत्वतां ।
परी प्रयोगहेतुपथा पर्यवसानीं दाखवी ॥

२९८१

सूड घ्याया पतिवधाचा प्रयोग दाविला त्याचा ।
जागृत केला प्रजाजनाचा क्षोभ प्रत्यक्ष दर्शनें ॥
जन खवळले सिंधुपरी अमर्याद धांवले शत्रूवरी ।
प्रयोग दाखवून यापरी साधिलें वैरनिर्यातन ॥
नृपतीची वधकथा होती श्रुत जरी सर्वथा ।
परी प्रयोगांत ती पाहतां स्फुरण चढे विशेष ॥
श्राव्याहूनि दृश्याचा हाच परिणाम असे साचा ।
मेळ या उभयांचा प्रयोगांत राहतसे ॥

## रंगसाहित्यकार

वेषाभिनययुक्तें रस भावसत्वें ।
दाविती नाना भूमिकेतें 'नट' संज्ञें ते प्रसिद्ध ॥
यांवीण जे आणीक असती रंगसहायक ।
प्रत्यक्ष कोणी अप्रत्यक्ष रंगपीठीं लागतीं ॥
त्यांचीं कथूं वर्मकर्में वर्तती जे नाट्यधर्में ।
प्रयोगीं प्रेक्षक भ्रमे कौशल्यें जयांच्या ॥
सूत्रधार मुख्य चालक नटी स्त्रीभूमिकासाह्यक ।
हंसवून-सुचवून विदूषक रंगदोष झांकीतसे ॥
वादका कुशीलव म्हणती माल्यकार पुष्पें रचिती ।
रत्नादिकें अलंकारिती संज्ञा त्यांसीं मुकुटकार ॥
रजक शोधी वस्त्रसंभार नटवी भूमिका तो वेषकार
कारुक आणि चित्रकार निर्मिती चतुर शिल्पकर्म ॥
द्वारपाळ रंगाध्यक्ष प्रयोगकार्यी महा दक्ष ।
असती प्रयोग परीक्षक प्राश्निकमंडळ त्या नांव ॥
सूचिक साधी वेषातें नापित केशरचनेतें ।
प्रयोगीं छिद्रप्रच्छादनातें वादकगण योजिला ॥

उपपात्रें यापरी जवनिकेच्या आंत बाहेरीं ।
प्रयोगकार्य करी अदृश्य राहून कौशल्यें ॥

## उपसंहार

असो भरतमहामुनींनीं कथा जी कां ऋषीगणीं ।
कथिली ती स्वजनीं प्राकृत वचनीं निरूपिली ॥
विस्तारार्थ कथा कांहीं आढळल्या इतर ठायीं ।
रहाव्या नटांच्या संग्रहीं म्हणूनीं त्याही गोंविल्या ॥
नाट्याची थोर योग्यता देवमहर्षीसंस्तुता ।
ही श्रोत्यांस मानवतां वक्ता आनंद पावेल ॥
नाट्यक्रिया नव्हे चाउटी किंवा लेंकरांच्या गोष्टी ।
कीं भलत्यानें त्यासाठीं उठाउठी करावी ॥
अभ्यासें अधिकारी व्हावें मग नाट्य हातीं घ्यावें ।
नातरी शापप्रभावें जोडावें दैन्य-दुष्कर्म ॥
नित्य हें नाट्यपुराण नटें केलिया पठण ।
यांतील रहस्यज्ञान पुण्य यश देईल ॥
श्रीक्षेत्र जनस्थान पंचवटी त्यांत पावन ।
श्रीगोदारामचरण-संनिध पूर्ण कृती ही ॥
शके अठराशें अठ्ठाविशीं कार्तिक शुद्ध एकादशीं ।
शुभार्थ शुभदिवशीं पूर्णतेसी पावली ॥
पुढें शके चवेचाळिसांत आषाढ शुद्ध मासांत ।
वाढवूनि हा ग्रंथ एकादशीसाचि पूर्ण झाला ॥

REFBK-0002141

REFBK-0002141

# बक्षिस.

अभ्यासदृष्टीनें या पुस्तकाचा पाठ करून आम्हांस कळवावें. आम्ही कांहीं प्रश्न पाठवून परीक्षा घेऊं त्यांत जसे गुण दिसतील त्याप्रमाणें बक्षिस देण्याचा आमचा हेतु आहे.

अनंत वामन बरवे, नाट्यशाळा, पुणें.

---

# आमची राष्ट्रीय नाट्यशाळा

( शाळेमध्यें होत असलेलीं कार्यें. )

१ नाट्यविषयाचें व वक्तृत्वाचें पद्धतवार शिक्षण समक्ष किंवा पत्रद्वारांहि मिळते.

२ शाळापाठशाळांतील मुलांमुलींना समारंभासाठीं नाट्यप्रवेश तयार करून बसवून दिले जातात.

३ ' क्लबां ' साठींहि त्यांच्या स्थलकालपात्रांनुरूप नाटकांची रंगावृत्ति करून मिळतें.

४ होतकरु कवींचीं नवीं नाटकें वाचून योग्य सूचना व उत्तेजक अभिप्राय दिले जातात.

३१५ नारायण पेठ, पुणें.